आतां आटोपतांच नित्याप्रमाणें मी बिन्हाडीं गेलों व इतर सर्व मंडळी आपल्या बिन्हाडीं गेली. आम्ही घरीं येऊन जेवण्याची पात्रें टाकतों तोंच ५।६ फकीर आले व म्हणाले और बहुत आता है. मालिकनें हम सब लोकक्रूं तुम्हारे वहां जानेको बोल दिया है. हें ऐकतांच आमची मंडळी घाबरून म्हणाली दुसरा स्वैपाक करावा, नाहीं तर फजीती होईल. बाबा तर २।३ फकीर बोलले आणि हे तर १५।२० आले. आतां कसें करावें म्हणून मंडळीला फिकीर पडली. मी म्हणालों घाबरूं नका व मोठें तपेलेंभर आधण ठेविलें व आलेलीं पात्रें जागेच्या संकोचामुळें वाढून आलेल्या मंडळीस पात्रांवर बसण्यास सांगितलें व कोणीही परत जाऊं नका म्हणून सर्वांस विनंती केली. मग पहिली २० ची पंगत उठली तरी स्वैपाक शिल्लक होता. मागाहून १० बसले त्यावेळीं आधणमात्र सणसणून आलें. तांदुळही धुऊन ठेवलेले घेतले पण त्यांत टाकण्यास मन होईना. मंडळी बसली आहे, त्यांना जेऊन जाऊं दे; मग आपण घरची मंडळी बसूं. असें म्हणतां म्हणतां तेही १० जण जेऊन उठले. आतां बाहेर कोणी नाहीं घाबरूं नकोस, असें मी कुटुंबास म्हटलें. शिजलेला स्वैपाक शिल्लक होताच. आतां आपल्यास अधिक तांदुळ वगैरे टाकण्याचें काम नाहीं. असें झाल्यावर मग मी विडा दक्षिणा घेऊन श्रीकडेस गेलों. त्यावेळीं श्री फकीरबाबाबरोबर बोलत होते. नंतर विडा दक्षिणा देऊन श्रीस चला म्हणून म्हणणार, तोंच श्री फकीरबाबास म्हणाले आज मी फार जेवलों बरका, पण भाऊ फार घाबरला होता. मग श्रीनें विडा घेतला आणि मला म्हणाले जेव जा आतां. मग लवकर जेऊन ये आणि अवघ्यांना त्या शिंप्याच्या माणसांना देखील जेऊं घाल. भिऊं नको अल्ला है. होय जेऊन लवकर ये. नंतर मी चरणीं मस्तक ठेवतों तोंच मला उदी घेण्यास सांगून उदी मला लाऊन व वरदहस्त मस्तकीं ठेऊन मला लवकर जाऊन जेऊन येण्यास आज्ञा दिली. मी घरीं गेलों आणि सर्वत्र मंडळी मिळून जेवण्यास बसलों. आम्ही सारे जेवलों तरी स्वैपाक शिल्लक होतांच. मग आम्ही सर्वजण आश्चर्य करून श्री बाबांची लीला अगाध आहे,

असें म्हणतच बसलों. पान विडा घेतला व नंतर श्रीच्या दर्शनास मी व बाळाजी असे गेलों. मीं कांहींच बोललों नाहीं, मात्र श्री बाळाजीस म्हणाले ' काय बाळाजी कसं काय? अवघे जण जेवले का.' बाळाजी हांसून म्हणाले 'बाबा गरीबांची परिक्षा घेतां कां? सकाळीं म्हणाले कीं आपण गरीब ३।४ फकीर घालावे आणि तुम्हीं तर ३० फकीर पोरासोरांसुद्धां पाठविले परंतु आपली अगाध सत्ता हे सद्गुरु. तरीं बाबा पहिल्या स्वैपाकांतच अवघीं मंडळी जेऊन अजून तें जेवण आम्हाला व घरच्यांना मिळून आणखी दोन दिवस पुरेल इतकें झालें आहे. आणि हे खरं आहे बरका बाबा; मी स्वतः पाहिलें. श्री म्हणाले बाळाजी गरीबोंका वाली अल्ला है. माझा भाऊ हैवान नाहीं बरं बाळाजी. त्या अन्नापैकीं थोडें अन्न प्रसाद म्हणून घरीं दादर वर आणूनही आम्ही खाल्लें. आम्ही याप्रमाणें शिर्डीस जेवण झाल्यावर, ३ रे दिवशीं घरीं परत आलों.

एकदां मी एकाएकीं शिर्डीस जाण्याचा विचार केला. त्यावेळीं श्रीला नैवेद्य करण्यास वेळ न मिळाल्यामुळें घरांतून मला बाबांना कांहींच घेतां आलें नाहीं. दादरवरून एक दोन डझन आंबे तरी घेऊन जावें म्हणून मी दादरवर तपास केला, परंतु आंबे चागले नसल्यामुळें मी दुसरीं फळें वगैरे घेतलीं व गेलों. जातांक्षणीच, बाबा म्हणतात आलास? कोण कोण आलें? मी म्हटलें बाबा मीच आलों, बाबा विचारतात कां बरं आलास? मी म्हटलें आपण बोलावलें म्हणून आलों. बरं मग मला आंबे सांगितलेले आणलेस का? दे. मग मी म्हणालों कीं, नाहीं, चांगले नसल्यामुळे आणले नाहीं. हीं केळीं वगैरे आणलीं आहेत. बाबा म्हणाले ठ्या बरं राहुं दे. आंबे उद्यां येतील तेव्हां खाऊं. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं बरोबरच पार्सल आलें. त्यावेळीं मी लेंडीवरील बागास कंपाउंड करीत होतों तेथें बाबांनीं रा. रा. बापूसाहेब जोग यांना पाठविलें व त्यांना सांगितलें कीं जा आणि रामभाऊपासून १०० रु. मागून आण. मजकडे पैसे मागतांच मी म्हणालों बरें आहे. ते परत गेले तों पुन्हा

विश्वनाथापासून १२५ माग असा निरोप आला. तरीं मी न जातां माझा साष्टांग नमस्कार पाठवून दिला व म्हटलें बापूसाहेब, हें तारेचें बंडल सोडीत आहें हें टाकून येतां येणार नाहीं, कारण तसेंच टाकलें तर तें गुंतेल व मग फारच त्रास पडेल. मग ते गेले तरींही बाबांनीं त्यांना पुन्हां म्हटलें त्या भाऊ जवळून १५० रुपये मागून त्याला बरोबर घेऊन ये; परत येऊ नकोस. त्यावेळीं सुमार १॥–२ चा सुमार होता. ते आले व मला म्हणाले कीं १५० रुपये घेऊन चला. मी तुम्हांला घेतल्यावांचून जाणार नाहीं. घेतल्यावांचून येऊं नको म्हणून सांगितलें आहे. ह्यावरून माझा असा तर्क होतो कीं, तुम्हीं इतक्या उन्हांत येथें काम करतां हें श्री बाबांना पसंत नाहीं. व एक आंब्याचें पार्सलही आलें आहे, त्यावर तुमचे नांव आहें; करितां चला. त्यावेळीं माझी थोडी तार राहिलेली मी आटोपून घेतली व त्यांच्याबरोबर गेलों. कारण माझ्याकरितां त्यांचे वाचन बंद झालें आहे व उन्हांत उगाच यावें लागते. त्यावेळीं आम्हीं उभयतां गेलों तेंव्हां बाबा म्हणालें काय बापूसाहेब काय म्हणालात? ते म्हणाले कीं हे पहा आपल्या समोर पाया पडत आहेत. आतां त्यांनाच विचारा. काय बापूसाब हा भाऊ की नाय अगदीं वेडा झाला. रातचा निजत नाहीं दिसाचाबी बसत नाही तेंव्हां काय करावें, आपलें लेंकरू आपण संभाळलें पाहिजे. मग बाबांनीं मला विचारलें जेवलास का. मी म्हटलें होय. त्यावर मला म्हणाले मग बस; आतां ते आंबे खा. उन्हाचा जाऊं नकोस. बाबा आंबे माझ्याकडून कोण पाठविणार नाहीं दुसरे कोणाचे असतील. ते म्हणाले मी हयवान नाहीं. तुझेच आहेत; खाय. मग रागावतील असें पाहून मी पार्सल उघडलें व दोन आंबे काढले व श्रीला देऊ लागलों. तें म्हणाले आधी तूं खाय फकिर बाबाला दे. मीं म्हणालों कीं आपण न घेतला तर मी घेणार नाहीं. मी जातों कामाला. व माझें मनास वाटलें कीं माझ्या घराहून कोण पाठविणार नाहीं आणि हें काय आहे हें मला समजत नाहीं; म्हणून मला एकदम रडूं आलें. ते म्हणाले कीं रडावं कशाला. मी आहे ना. तुझेच आहेत बरं. मग त्यांनीं आंबा चोखून फकिरबाबास दिला व दुसरा

आपण घेऊन थोडा खाऊन तोच मला परत दिला व 'खाय' खाऊन घेय,' असें म्हणाले, व नंतर तो करंड श्रीरामकृष्णीला देऊन ये दिल्याशिवाय राहू नकोस असें म्हटलें. मीं तसाच करंड ठेऊन आलों तों मला पांच वाजेपर्यंत कुठे जाऊं दिलें नाहीं. मध्यंतरीं मात्र न्याहरीच्या वेळीं म्हणाले कीं काय रामकृष्णीची न्याहारी आली नाहीं होय. ती आण जा वेडा होऊं नकोस. मग मी जाऊन न्याहारी आणली. त्यावेळीं ते व फकीरबाबा न्याहारीस बसले व मला म्हणाले बस, जाऊ नकोस मी आतां येतों. मी म्हणालों बाबा मी आईकडे (राधाकृष्ण) जाऊ का ? नको बसून राय. नंतर न्याहारी आटोपली. सर्व मंडळी वगैरे येऊन दर्शन करून सेवा करू लागले. त्यावेळीं मी पुन्हा विचारलें बाबा जाऊं का? सकाळीं जाऊं मग. सकाळीं गेलों तेव्हां जेऊन जाव उपाशी जाऊं नये. मी येतों मी आतां कंटाळलों. तेल्यानें व वाण्यानें मला वैताग दिला. मी तुझ्या संग येतों."

एकदां मी शिरडीस असतां एके दिवशीं सकाळीं स्नान वगैरे आटोपून वाड्यापाशीं आलों तों श्री बाबा लेंडीवर जाण्यासाठीं वाड्यापाशीं उभे होते. लोक दर्शन वगैरे घेऊन श्री आनंदात होते इतक्यांत मीही वस्त्रें वगैरे बदलून दर्शनास गेलों त्यावेळीं श्री फार आनंदांत होते. मी पुढें होऊन दर्शन घेण्यास जातों, तोंच एकदम नरसिंह अवतार धारण करून माझ्या आंगावर आले व 'खबरदार, वर येऊं नकोस, तू मला लय तरास देतोस, चावडींतबी बसू देत नाहीं व मशिदींतबी बसू देत नाहीं. तुझें डोळें फार खराब आहेत' असें म्हणून दीक्षीत यांस म्हणाले, "काका मला सुरा आणून दे. आरतीच्या वेळीं मी याचे डोळे काढून टाकतों व मग याला हाकून देऊं. ह्यानें लय वैताग आणला आहे" असें म्हणून मला अशा दर्शनाचा लाभ या मिषानें दिला. मी लांबच झालों व कांहीं वेळानें पुढें गेलों त्यावेळींही मी सर्वांच्या मागें मागें गेलों मग परत येतांना श्री० काकासाहेब दीक्षीत मला म्हणाले, "काय पुरंदरे, आज तर बाबा तुमच्यावर फारच रागावले ! मला सुरा द्यावयाला सांगितलें आहे बरं. आतां आज आमच्या ईथेच सर्वांनी जेवायाला यावें बरें

बाबांचा राग मानूं नका असें म्हणत मला वाड्यांतच घेऊन गेले व न्याहा-रीस बसविलें व तेही फारच हंसत होते. काय असेल तें त्यांचें त्यांना माहीत. मग मी श्री० राधाकृष्णाआईकडे गेलों. त्यावेळीं आई म्हणाल्या ' आतां चावडींत पालखी ठेविली आहे. तिचे चार गोंडे कोणी नेलें न्ही आतां ती कुठें ठेवतोस वगैरबद्दल आमचा विचार चालला होता. मी म्हणालों ती मशिदीच्या बाजूला ठेवावी. मी एक पत्र्याची खोली करतों तिच्यांत पालखी कडी कुलूप लावून ठेवूं म्हणजे झालें. गरज लागेल तेन्हां घ्यावी व पुन्हा तेथें ठेवावी. हें काम उद्या करूं असें म्हटलें पालखी नारायण तेल्याच्या बाजूला ठेवावी असें मला वाटलें कारण ज्या बाजूला श्री बाबा उभे रहातात व लघवी वगैरे करतात ती जागा तूर्त[1] रिकामी ठेवावी. तें त्यांना पटलें व त्या म्हणाल्या, ' तुझ्या आईची परवानगी घे आणि उद्या करून टाक. तू गेलास कीं कोणी करणार नाहीं. पण इतकें काम आटोपेपर्यंत तुला रजा पाहिजे. तुझ्या आईनें (श्री बाबा) तुला ठेवलें पाहिजे. इतक्यांत श्री० काका-साहेबही तेथें आलें. त्यांनाही हा विचार कळविला व तो त्यांना पसंत पडला. ते म्हणाले, 'बाबांची परवानगी घेऊन करून टाकूं' व नंतर त्यांनीं आरती आटोपल्यावर विचार म्हणून सांगितलें. व आम्हीं त्याप्रमाणें केलें व नंतर त्यांनीं श्री राधाकृष्णाआईला लेंडीवर जातांना झालेली सर्व हकीगत कळ-विली. त्या फार रस्ताळूं लागल्या व म्हणाल्या कीं माझी ताई आली कीं मी तिला घटकाभर किंवा रात्रीही बसूं देत नाहीं व तीही बसत नाहीं. इथें चार दिवस येतें आपल्या आईच्या चरणापाशीं तर तेथेंही तिला सुख नाहीं. असो. तिची आईच तिला सांभाळते. मग श्री काकासाहेबांनीं मला पुन्हां जेवण्याबद्दल सुचविलें, ' काय येणार ना, कां तमच्या मंडळीला सांगूं असें म्हणाले. मी पुन्हां त्यांनां सुचविलें कीं आम्हीं सर्वजण येऊं. श्री बाबांच्या[2] प्रसादास नको कोणी म्हणावें ? मग दुसऱ्या दिवशीं लेंडीवर गेल्यावर आम्ही ठरल्याप्रमाणें श्रीच्या पालखीच्या खोलीची सुरवात केली. सकाळ-पासून मी व काकासाहेबांचा गडी फकीरा मिळून सर्व फरशीच्या लादीचे

१ राधाकृष्णाबाई मला ताई म्हणून हाक मारीत. २ श्री साईबाबा.

तुकडे जमा करून त्या एका बाजूनें सारख्या बसविल्या व जमीन स्वच्छ सारखी केली त्यावेळीं ह्या तुकड्याखालीं विंचूचे अगदीं थरावर थर होते परंतु आम्हांला त्यांनीं अगदीं त्रास दिला नाहीं. लादी उचलून पहावी तों खालीं आहेच ! मग ते सर्व विंचू पुन्हा नवीन लाद्यांखालीं जाऊन बसले व मग चिखल वगैरें तयार होतांच आम्हीं श्रीच्या मशिदीच्या भिंतीस भोकें पाडून दांडकी बसविलीं. दोन बसविलीं व तिसऱ्यास सुरवात करून थोडें भोक पाडलें इतक्यांत श्री लेंडीवरून परत आलेच. ते पादप्रक्षालनास न जातां नेमके त्या ठिकाणींच आले. तेथील सर्व मंडळी पळाली होतीच. मात्र मी खाली व फकिऱ्या तो त्याच्या वरावर होता तोही श्री आल्यावरोबर मागें सरला. मी मात्र लाकडाचे घोड्यावर राहिलों, त्यामुळें मला हालतां आलें नाहीं कारण डोकीवर पत्र्याचें वजन होतेंच व तें काम ओलें असल्या कारणानें भोकांस व दांडक्यास मजबुती नव्हती व तिसरें भोक पुरें करावयाचें होतेंच. इतक्यांत श्रीनें तेथें नारसिंह अवतार धारण करून मला मानेला धरलें व मारण्याकरितां विटकर हातांत घेतली. मी खालीं उतरलों तेव्हां टेकू देऊन मला धरून दरवाजापाशीं तीनवेळ धरून मला बराच दम दिला. मान तशीच धरून ठेवली व मला म्हणाले, 'निघून जाय तूं लय वैताग दिलास, मी तुला मारून टाकीन. जातोस का नाहीं ? " मी म्हणालों कीं मी पालखीची खोली केल्यावांचून जाणार नाहीं. मी तुमची मशीद फोडीत नाहीं. जरा जरा भोकें पाडून घेतों मग झाले. आतां शेवटचें भोक मात्र थोडें राहिलें आहे.बाबा म्हणाले,'तू माझी बरोबरी करणार काय? पाहून घेईन. आज म्हवा लय चेवला आहे. याद राख. लोच काहीं वेळानें मला म्हणाले कीं बर आतां तुला वाटेल तसें कर. मग आपण चांगली जागा बांधू बरं. जाय. नंतर ते पादप्रक्षालन करून मशिदींत जाऊन बसले. तेथेंही भिंतीवर आवाज झाल्यावर शिव्यागाळीचा वर्षाव मजवर सुरूच होता. मग त्यांच्या कृपेनेंच आम्हीं तें काम संपविलें. वरचे पत्रे टाकले तों मंडळी आर्ती आटोपून घरीं जेवण्यास गेले. तरीही काम पुरें झालें नव्हतें. मग श्री

न्याहारीस बसून सर्व फकीर वगैरे जेऊन गेले तरी मी तेथेंच होतों. मग श्री साईबाबा फकीरबाबास म्हणू लागले कीं पहा हा भडवा चेवला जेवायलाबी येत नाहीं. मला भूक लागली, माझी पोरेंसोरें वाट पहातात. खाण्यापेण्याचीही परवा कधीं करीत नाहीं. चेवला भडवा अगदी चेवला व रांडाही चेवल्या. हें झाल्यानंतर त्यांनीं फकिर बावांकडून मला बोलाविलें व म्हणाले, वर ये तुला दावतों. माझी मशीद फोडलीस काय? याद राख. ये वर ये असें म्हणाले. मी वर गेल्यावर मला मारण्यास उठले. माझा हात धरून मला बैठकीजवळ नेलें व म्हणाले जा. आता जेव जा माझीं माणसें तळमळतात. कां सर्वांना तूं ताप देतोस. मला बी ताप देतोस. बायकोला व पोरांसोरांनांबी ताप देतोस. जा जेव जा आधीं. मग तिसरे प्रहरीं काम कर जा. मग मी चरणीं मस्तक ठेउन वर उठलों. त्यावेळीं मला उदी घेण्यास सांगितलें ती मी घेउन त्यांच्या हातांत दिली. त्याची काहीं माझ्या कपाळीं लाउन शिरावर कृपेचा वरदहस्त ठेवला व म्हणाले जाय अशीच निष्ठा ठेव. अल्ला तुला पावेल. तुला मस्त देईल. मनकी मुराद भरकर देयगा. तुला माझी मशीद जाब देईल. मी गेलों व जेवून विडा घेऊन लगेच आलों तों श्री उठण्याच्या बेतांत होते. फकीरबाबा उठून उभे होतेच. त्यांना म्हणाले पहा आला भडवा. त्याला चैन नाहीं. घटकाभर बसावें पडावें बापुसाहेबापाशीं जावं पोथी ऐकावी. काय भडवा चेवला. त्याला माझी मशीदनी चावडी फोडातोडायचेंच दिसतें. असो त्याची नियत त्याला. गरीबोंका वाली अल्ला है. अल्लासे बडा कोई नहीं. माझी मशीद लई खांडली. सर्व पैका नेला गुलामानें चोरून. त्याला कांहीं भला समजू नको. तूं पहा मी त्याचें काय करितो तें. त्याला १।२ दिवसांनीं हाकून देतों. आपा कोत्याला बोलवून आणतो पहा. फकिरबाबा म्हणाले कीं क्यौ फिर इतना घुस्सा पुरंदरेके उपर क्यौं करता है. तो बिचारा रातदिन मरता है. बिचारा खानेपिनेकी फिकीर नहीं करता और आपके वास्ते हमेशा हजिर रहता. आपबी उसकों हमेशा याद करते है और जबी आता तबी ऐसा घुस्सा करता है. ए क्या है. अच्छा चलो तुम आता है के नहीं. अल्ला है. व मग ते गेले व फकिरबाबास पोहचवून आले.

एकदां मी श्रीगुरुपौर्णिमेस गेलों त्यावेळीं मजबरोबर ह. भ. पंडीत, मोरेश्वर र. पंडीत, व दाजी पांडू वर्तक असे होते. ह्यावेळीं माझ्याबरोबर चार बोजे मोठे झाडांचे रोपांचे होते. सायंली, चमेली, मोगरा वगैरे हे सर्व रोप माझे मित्र म. आ. देव्हारे यांनीं मला दिले हे मी श्रीचे पुजेस फुलें मिळावीं ह्या हेतुनें नेले होते. कारण शिर्डीत श्रीची पुजा बहुतेक तरवडांच्या फुलांनींच होत असे त्याबद्दल मला फार वाईट वाटे. हीं झाडें व वेली तयार झाल्यावर श्रीला नेहमी सुवासिक फुलें व हार ताजे मिळावे ह्या हेतूनेंच ते घेतले होते. प्रथमतः कोपरगांवासच गाडी मिळाली नाहीं. मग हसन टांगेवाला नेहमीचा ओळखीचा असल्यामुळें त्यानें टांग्यांतून आम्हांला व ते बोजे जेमतेम स्टेशन पासून कोपरगांवापर्यंत घेऊन गेला व तेथें गोदावरीवर आम्ही बैलगाडीचा बराच तपास केला परंतु गाडी मिळाली नाहीं. मग आम्हीं सर्वांनीं मिळून एक एक बोजा डोकीवर घेऊन जाऊं, हरकत नाहीं श्रीची मर्जी आर्ति चुकविण्याची असेल तर चुकवोत परंतु झाडांचे बोजें नेऊच असा निश्चय केला व त्याप्रमाणें ते बोजे उचलून आम्हीं गोदावरीच्या पैलतीरीं आसपास जातों इतक्यांत शिरडीहून तीन टांगे आले व ते सर्वजण ओळखीचे असल्यामुळें टांग्यावाल्यास आम्हाला उभें करून जाऊं नका आम्हीं येतों असें म्हटलें. त्यावेळीं आम्हीं नदी उतरून स्नानें वगैरे आटोपून बसलों होतों. इतक्यांत एक टांगा आलाच मग आम्ही सर्वजण टांग्यातून शिर्डीस गेलों तों आर्ती आटोपली नव्हती. श्री म्हाळसापती भक्त मला भेटले ते निमगांवाहून परत येत होते. तेही म्हणाले कीं बहुतेक आर्ती झाली असेल, मग आम्ही टांगा हाकला व शिर्डीस उतरून झाडांचे बोजे श्री राधाकृष्णाआईच्या स्वाधीन करून नंतर श्रीच्या दर्शनास गेलों तों आर्ती सुरू झाली नव्हती. बापूसाहेब जोग नुकतेच आले होते. मी जाता क्षणींच बाबा मजवर रागावले व म्हणाले कीं इथें कशाला आलास जा तुझ्या आईकडेस. मग मी व मजबरोबरील मंडळी वर गेलोंच तों सर्वांनी दर्शन घेतलें. मीही घेतलें तेव्हां श्री म्हणाले कोण कोण आले पोरसोर

श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

## श्री शिर्डी संस्थानचा दुसरा म्हणजे शके १८४५ चा वार्षिक रिपोर्ट.

१. या वर्षांत संस्थान कमिटीच्या एकंदर ६ सभा झाल्या त्यांत कामकाज झालें त्यांपैकीं मुख्य मुख्य कामाचा गोषवारा या रिपोर्टांत दिला आहे.

२. श्री गुरुपौर्णिमेचा उत्सव—हा उत्सव श्री. गोपाळराव मुकुंद ऊर्फ बापूसाहेब बुटी व त्यानंतर त्यांचे चिरंजीव आपल्या खर्चानें साजरा करीत असत, आणि त्याची सर्व व्यवस्था त्यांचेकडेच असे. त्यामध्यें थोडा फेरफार श्री. पूर्णचंद्र गोपाळ बुटी यांनीं ता० २६ मार्च १९२३ चे सभेंत सुचविला तो असा—उत्सवाची सर्व व्यवस्था संस्थानानें करावी, आणि खर्चाबद्दल श्री. बुटी यांजकडून दर वर्षी रु० ५०० घेत जावे. इतर भक्तांकडून वर्गणी येईल तीही संस्थानानें घ्यावी. हा फेरफार संस्थानकमिटीनें मान्य केला, आणि त्या प्रमाणें गुरुपौर्णिमेच्या उत्सवाची व्यवस्था संस्थानानें केली. अर्थात् श्री. पूर्णचंद्र भय्या उत्सवाला हजर होते आणि योग्य ती मदत करीत होते. उत्सवाचा खर्च वजा जातां शिल्लक ४३३४८।। राहिली. त्यापैकीं तीनशें रुपये संस्थानचे कायम फंडाकडे वर्ग करण्याचा संस्थान कमिटीनें ता. १३-४-२४चे सभेंत ठराव केला आणि त्याप्रमाणें ती रकम वर्ग करण्यांत आली आहे. त्याच सभेंत श्रीपुण्यतिथि फंडापैकीं तीनशें रुपये कायम फंडाला वर्ग करण्याचें ठरलें व ती रकमही वर्ग झाली आहे.

३. वेशीसमोरील कमानी काढाव्या कीं काय हें ठरविण्यासाठीं संस्थान कमिटीनें ता० २८–३–२३ रोजीं एक सब-कमिटी नेमिली होती. त्या कमानी काढण्याचें कारण नाहीं असें सदर सब-कमिटीनें रिपोर्ट केल्यावरून तें प्रकरण दाखल दप्तर करण्यांत आलें.

४. त्याच म्हणजे ता. २८–३–२३ चे सभेंत लेंडीचे जागेची पुढील व्यवस्था काय करावी, हें ठरविण्यासाठीं एक सब-कमिटी नेमिली होती. तिनें रीपोर्ट केला कीं जास्ती जागेसाठीं सरकाराकडे अर्ज केला आहे. त्याचा निकाल होईपर्यंत हें प्रकरण तहकूब ठेवावें. तो रिपोर्ट कमिटीनें मंजूर केला. त्यानंतर म्हणजे चालू सालीं ता. १३–४–२४चे सभेंत लेंडीचे जागेवर ( महाराजांची बसावयाची जागा व त्या लगतचा भाग वगळून बाकीच्या जागेवर ) आमराई लावावी असें ठरलें. त्याप्रमाणें व्यवस्था लवकरच करण्यांत येईल.

५. श्रींच्या समाधीवर संगमरवरी दगडाची फरशी करण्याबद्दल विचार करण्यासाठीं ता० ७-४-२२ रोजीं एक सब-कमिटी नेमिली होती. सब-कमिटीचा रिपोर्ट होण्यापूर्वीच श्री. बुटी यांनीं त्या कामाला लागणारा खर्च आपण करूं असें कळविलें, व त्याप्रमाणें तें काम चालू सालीं झालें आहे. याचबरोबर सभामंडपाची फरशीही करण्यांत आली आहे. समाधीच्या दोन्ही बाजूलाही तशीच फरशी करण्यांत आली आहे. बाजूच्या फर्शीचा खर्च रा. रा. व्यंकट लिंबाजी कोडळ यांनीं केला आहे. सभामंडपाच्या फर्शीचा खर्च कोणी द्यावा हें अजून ठरलें नाहीं.

६. संस्थानच्या जुन्या भांड्यांपैकीं कोणतीं विकावीं व कोणतीं दुरुस्त करावीं हें ठरविण्यासाठीं एक सब-कमिटी नेमण्यांत आली होती. त्या सब-कमिटीनें असा रिपोर्ट केला कीं, तांब्यापितळेचीं भांडीं कांहीं दुरुस्त करावीं व कांहीं फुटलेलीं भांडीं मोडींत देऊन त्याबद्दल दुसरी भांडीं घ्यावीं. आणि चांदीच्या दोन लहान ताटल्या होत्या त्या मोडून त्यांचें एक सुबक तबक करवावें. हा रिपोर्ट संस्थान कमिटीनें ता० २८-५-२३ रोजीं मंजूर केला. सब कमिटीनें सुचविलेल्या कामासाठीं साठ रुपयांची मंजूरी दिली. त्याप्रमाणें भांडीं दुरुस्त होऊन तबकही तयार झालें आहे.

७. समाधीवर झालेल्या फर्शीकामावर संगमरवरी छत करावें किंवा नुसता कठडा करावा याचा विचार चालू आहे. त्या कामाचे प्लान व एस्टिमेट मागवलें आहे. छतासाठीं रा. रा. सुंदरराव नवलकर यांनीं एक हजार रुपये देऊं केले आहेत.

७ अ. संस्थानचे मदत खजिनदार रा. रा. यशवंत जनार्दन गाळवणकर यांनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला. तो संस्थान कमिटीनें मोठ्या दिलगिरीनें मंजूर करून त्यांचे जागीं रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे यांची नेमणूक केली.

८ संस्थान कमिटीचे सभासद रा. रा. गणेश दामोदर केळकर हे गेल्या जानेवारीमध्यें वारले. त्यांचे मृत्युबद्दल संस्थान कमिटीनें अत्यंत खेद प्रदर्शित करून त्यांचे जागीं रा. रा. मेघश्याम भगवंत रेगे. बी.ए. एलएल्. बी. यांची नेमणूक केली.

९. संस्थानचा कायम फंड वाढविण्यासाठीं संस्थान कमिटीनें कांहीं प्रयत्न केले. पण त्या प्रयत्नास अजून यावें तसें यश आलें नाहीं. कायम

फंडांत देऊं केलेली रक्कम रुपये २१७१७-११-६ आहे व आतांपर्यंत वसूल झालेली रक्कम ७४६६-११-६ आहे. त्यांतून कायम फंडाकडे खर्च पडलेल्या रकमांची बेरीज १३२-१५-६ वजा करितां कायम फंडाची नक्की शिल्लक ७३३३-१२. आहे. पैकीं गतवर्षी रुपये ३५०० च्या सरकारी नोटा घेतल्या. यंदां रुपये २००० च्या घेतल्या आहेत. एकूण सरकारी नोटा रुपये ५५०० च्या आहेत. त्याशिवाय रा. रा. निळकंठराव सहस्रबुद्धे यांनीं श्रीच्या पुण्यतिथीच्या खर्चासाठीं रु. १०० ची नोट दिली आहे.

१०. या वर्षाच्या बजेटांत घोडयाचें घर आणि चावडी यांची दुरुस्ती करण्याबद्दल आणि रथासाठीं खोली बांधण्याबद्दल रकमा मंजूर केल्या होत्या; पैकीं घोडयाचें घर आणि चावडी यांची दुरुस्ती झाली आणि रथाचे खोलीचें काम चालू आहे.

११. भक्तमंडळाच्या सभासदांची संख्या या वर्षाअखेर २४१ होती आणि वर्गणी वसूल झाली तिची रक्कम १६५३-१५-६ आहे. अजून बरीच वर्गणी येणें बाकी आहे. व त्याबद्दल खजिनदारांकडून मंडळींना सूचना जात आहेत. त्यांचेकडून ती लवकर येईल अशी आशा आहे.

१२. कांहीं भक्तांच्या सूचनेवरून दर गुरुवारीं महाराजांची पालखी काढण्याची वहिवाट सुरू केली आहे. पालखी मशीदींतून निघून चावडींत जाते. तेथें महाराजांची आरती होऊन पालखी वाडयांत नेली जाते व तेथें नेहमींप्रमाणें शेजारती होते.

१३. सोबत या वर्षाच्या हिशोबाचा आढावा जोडला आहे, तो संस्थानचे ऑडिटर रा. रा. जिवाजी कृष्ण परूळकर यांनीं तपासून मंजूर केला आहे व त्यावर त्यांची सही आहे. रा. परूळकर संस्थानचें ऑडिटचें काम कांहीं मोबदला न घेतां करितात याबद्दल संस्थान त्यांचे आभारी आहे. यावर्षी संस्थान कमिटीनें बजेट मंजूर केलें ते आकडे सोबत दिले आहेत. त्यावरून असें दिसून येईल कीं, दोन बाबी खेरीज करून बाकी सर्व बाबींचा खर्च बजेटांतील रकमांपेक्षां कमी आहे. त्यापैकीं एक बाब पगार खर्चाची आणि दुसरी रोषनाई खर्चाची. पूर्वीं संस्थानांत स्वयंपाक होत असे आणि संस्थानचे दोन नौकर म्हणजे सुरजदीन आणि रंगु गुरव तेथें जेवीत असत.

तेव्हां त्यांना जेऊन पगार अनुक्रमें आठ रुपये व दोन रुपये होता. गेल्या जुलै अखेर सुरजदीननें नोकरी सोडली. तेव्हां जी नवीन व्यवस्था केली त्यांत सुरजदीनचे जागीं नेमलेल्या मनुष्याला आणि रंगु गुरवाला अनुक्रमें बारा रुपये व आठ रुपये कोरडा पगार ठरला आणि श्रीच्या नैवद्याबद्दल एक मासिक रक्कम ठरवून दिली. त्यामुळें पगारखर्च वाढला पण त्या बरोबरच भोजन खर्च कमी झाला. बजेटांत भोजन खर्च व पगार मिळून पांचशे रुपये मंजूर केले होते. पण दोन्हीचा मिळून एकंदर खर्च फक्त रु. २६६॥=॥। झाला आहे. असें आढाव्यावरून दिसून येईल. रोषनाई खर्चाबद्दल बजेटांत ३०० रु. ची मंजूरी आहे. पण तो वास्तवीक ३२९८- झाला आहे. हा खर्च जास्त होण्याची कारणें दोन आहेत. एक कारण गुरुवारची पालखी, आणि दुसरें कारण मशिदींतील नवीन कंदील. गुरुवारीं पालखीनिमित्त रोषनाई खर्च होतो. तो वर्षाच्या मध्येंच सुरू झाल्यामुळें बजेटांत तो धरला गेला नाहीं. तसेंच मशिदींतील नवीन कंदीलामुळें महाराजांच्या तसबीरीवर प्रकाश उत्तम पडतो. पण त्या निमित्त म्यांटल स्पिरिट वगैरे खर्च वाढलेले चालू सालच्या बजेटांत आहेत. रोषनाई खर्च साडेतीनशें रुपये मंजूर केला आहे.

या वर्षाच्या खर्चाच्या बजेटचे मंजूर केलेले आकडे.

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| पूजा खर्च | २०० | मशीद रखवालदार | १५० |
| भोजन खर्च | ४०० | श्रीची दक्षिणा | ४०० |
| घोडा खर्च | २०० | शिर्डी किरकोळ खर्च | १५० |
| नंदादीप | २०० | मुंबई आफीस खर्च | २०० |
| रोषणाई | ३०० | तसलमात खर्च | १८० |
| धुणी सर्पण | १०० | रिपेर खर्च | — |
| पगार खर्च | १०० | जाळी कमान | १०० |
| वाजंत्री | २४० | घोड्याचें घर | २०० |
| | १७४० | चावडी | १०० |
| | | कोठीचें घर | ३० |
| | | रथाची खोली | ५० |
| | | | १५६० |
| | | [illegible] | |

१४. संस्थानचे मुख्य चार उत्सव महाराजांच्या कृपेनें समाधानकारक तऱ्हेनें साजरे करण्यांत आले. त्या सर्व उत्सवांची त्रोटक हकीगत आणि जमाखर्चाचे आकडे श्री साईलीला मासिकपुस्तकद्वारा छापून बाहेर पडले आहेत. हें मासिक महाराजांच्या कांहीं भक्तांनीं सुरू केलें आहे. अर्थात् याची नुकसानीची जबाबदारी संस्थानांवर नाहीं, पण नफा झाल्यास तो संस्थानच्या कायम फंडास देण्याचें व्यवस्थापकांनीं ठरविलें आहे. या मासिकापासून संस्थानच्या कामाला बरीच मदत होते. याला लोकाश्रय बरा मिळाला आहे. पण याहीपेक्षां जास्त मिळणें जरूर आहे. आणि महाराजांच्या भक्तांनीं नुसतें वर्गणीदार होऊन न थांबतां आपापले अनुभवही यांत छापण्यासाठीं लिहून पाठवावे अशी व्यवस्थापकांची विनंति आहे.

१५ एकंदरींत मागील वर्ष महाराजांचे कृपेनें सुखासमाधानानें पार पडलें. मात्र संस्थानची सांपत्तिक स्थिति असावी तितकी समाधानकारक नाहीं. भक्तमंडळाच्या सभासदांनीं मनावर घरलें तर वर्गणीदारांची संख्या बरीच वाढून मागील वर्गणी व चालू सालची मिळून बरीच रक्कम वसूल होईल. आणि कायम फंडांत बरीच भर पडेल असें वाटतें, आणि तसें करण्याबद्दल सर्व सभासदांस विनंति आहे. सभासदांनीं प्रयत्न केल्यास त्यांना महाराज यश देतील असा भरंवसा वाटतो.

१६. शेवटीं महाराजांच्या आरतींत म्हटल्या प्रमाणें:—

**देवा साईनाथा त्वत्पदनत भावें ॥**
**परमाया–मोहित–जनमोचन झणि व्हावें ॥**
**त्वत्कृपया सकलांचें संकट निरसावें ॥**
**देशिल तरिं दे त्वद्यश दासानें गावें ॥**

अशी महाराजांची प्रार्थना करून हा रिपोर्ट संपवितो.

**दासगणु**
अध्यक्ष,
**हरि सीताराम दीक्षित,**
चिटणीस.

श्री शिर्डीसंस्थानचा शके १८४५

**जमा**

| | रुपये | आणे | पै |
|---|---|---|---|
| गेल्या वर्षाची शिल्लक | | | |
| कोठी खाते जमा | ७२८ | १२ | ३ |
| भक्तांचें धर्मकृत्य खाते जमा | ५९ | २ | १ |
| मासिक वर्गणी खाते जमा | ९९ | १५ | ० |
| वार्षिक वर्गणी खाते जमा | १०९७ | १८ | ६ |
| पेटी खाते जमा | १४५६ | ० | ० |
| श्री साईनाथ सगुणोपासना खाते जमा | ८८९ | ७ | ३ |
| व्याज खाते | २५ | ० | ० |
| रा. शामराव रा. जयकर खाते जमा | २१० | ० | ० |
| श्री. गोपाळराव मुकुंद बुटी खाते जमा | १० | ० | ० |
| कायम फंड खाते जमा | १५० | ० | ० |
| | ३६२४ | ७ | ० |
| एकंदर रुपये | ७४५० | ११ | १ |

मी वरील जमाखर्चाचा आढावा हिशेबावरून तपासला तो बरोबर आहे. कायमफंडाचे सरकारी बाँड मी पाहिले आहेत.

Bombay 12th July 1924.

J. K. Parulkar

Certified Auditor

त्या जमाखर्चाचा आढावा.

| नांवें | रुपये | आणे | पै. |
|---|---|---|---|
| भक्तांचे धर्मकृत्य नांवें | ६२ | १४ | ० |
| श्री साईनाथ सगुणोपासना खाते नांवें | २१५ | ४ | ० |
| दक्षणा खाते नांवें | ३६६ | ० | ० |
| पूजा खर्च | १५५ | १० | ३ |
| भोजन खर्च | १७३ | ७ | ९ |
| तसलमात | ७६ | ५ | ६ |
| घोडा खर्च | १३५ | १५ | ३ |
| धुणी सर्पण | ४३ | ६ | ६ |
| नंदा दीप | १५३ | ५ | ९ |
| मशीद रखवालदार | ८० | ८ | ० |
| रोषनाई | ३२९ | १ | ३ |
| वाजंत्री | २४० | ० | ० |
| मशीद देव्हारा | ५२ | ९ | ० |
| शिर्डी किरकोळ | ८६ | ११ | ६ |
| पगार | ११३ | ४ | ० |
| मुंबई ऑफीस | ६९ | ६ | १ |
| इंपिरिअल बँक खाते नांवें | १००६ | ३ | ८ |
| श्री संस्थान हिशोब खाते नांवें | ४० | ० | ० |
| स्थावर दुरुस्ती | १६८ | ११ | ० |
| दामोदर घनःशाम बाबरेकर इस्टेट खाते नांवें | १७ | १५ | ६ |
| संस्थान भांडीं | ४४ | ० | ९ |
| कायमफंडासाठीं रु० २००० चे सरकारी बाँड घेतले त्यांचे नांवें * | २०५५ | ५ | ४ |
| शिलक वर्ष अखेर | १९८३ | १४ | ० |
| एकंदर रुपये | ७४५० | ११ | १ |

**हरि सीताराम दीक्षित,** चिटनीस

G. R. Dabholkar. खजीनदार.

* कायमफंडाचा तपशील:—पूर्वींचे रु. ३५०० चे सहा टक्याचे सरकारी बाँड.

चालू सालीं घेतले रु. २०००

श्रीमती हिराबाई कराड यांनी या सालच्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवास श्रीसाई-
बाबांचे समाधीसमोर म्हणावयास म्हणून पाठविलेल्या कविता.

श्रीशारदा प्रसन्न.

## वसंततिलका.

ही पौर्णिमा परमपुण्यतिथी विलोकीं ।
सच्छिष्य सद्गुरुस भेटति सर्व लोकीं ॥
किंवा करोनि परमोत्सव तद्गुणातें ।
गाती, मनांत धरुनी बहु आदरातें ॥ १ ॥

साई उदार गुरु ते मजला मिळाले ।
अज्ञान तें हृदयिचें बहु नष्ट झालें ॥
मद्भाग्य थोर म्हणुनी गमतें मनाला ।
तो धन्य जो निरखि सत्य तदुत्सवाला ॥ २ ॥

## आरती.

चालः—( आरती भुवनसुंदराची )

आरती करितें गुरुवर्या । सच्चिदानंद साई सदया ॥ धृ० ॥
प्रेमें धरिशि दिना हृदया । सकल मति-मल तूं नेशि-विलया ॥
कालसम दुष्टां दंडाया । पातला भक्तां सुखवाया ॥
अहा तूं ज्ञानमूर्ति तेजा । दिनमणि उदय पावे दूजा ॥
वेदश्रुति सार । उघडुनी द्वार । ज्ञान भांडार ।
सुजना दावाया । येशि जगीं जडमूढ ताराया ॥ धृ० ॥
घेउनि यवन वंशिं जनन । केलें द्वैताचें हनन ॥
। भवाब्धी तारक तव चरण ॥

भक्त परिवार। यात्रेचा भार। शोभे महाद्वार।
साई बोधसुधा प्याया। तत्पर असति सिद्ध ठायां ॥२॥

जाळिले सलिलाचे दीप। दाविली स्वलां भक्ति अमूप ॥
जळतां प्रचंड तृणराशी। आह्लादिलें इंधनासि ॥
घेउनि वैराग्याची सदसी। जर्जर करि जो षडरीशीं ॥
अतर्क्यचि झाला निगमासीं। हरिहर वंदित हो ज्यासी ॥
सांई योगी मुकुटमणी। ध्याने 'हिरा' दीन रजनीं ॥३॥

आषाढी पौर्णिमेला समाधीपुढें म्हणण्याकरितां श्री. के. जे. भीष्म (मोहपा) यांनीं पाठविलेलें पद,

सद्गुरु महति

(चा. हळु ग हळु आला.)

## पद.

हाचि सद्गुरु सद्गुरु साइनाथ। सच्चिदानंद मूर्तिमंत ॥ ध्रु० ॥ देह मी नसे ॥ असे न मी व्यक्त। बालिला गीतीं[1] भगवंत ॥ मूढ परि वदती। वदती त्या व्यक्त। दिसे हा संसारीं सक्त ॥ वदुनी ते फसती। फसती मायेंत। मोक्ष त्यांजवळि कधिं न येत ॥ बोध बोधाया। बोधा तनु धरित ॥ स० ॥ १ ॥ बघुनि आतुरता। भक्ताची। काढिली देहबुद्धि त्याची ॥ लाविती भक्ति। भक्ती देवाची। दत्त श्रीकृष्ण रामयाची ॥ कुणासी देती। देति मंत्रगुप्त ॥ स० ॥ २ ॥ बसुनि शिलधींत[2]। शिलधींत भक्त तारी। सकल नरनारि व्यसन वारी ॥ असा हा नाथ। नाथ सदाचारी। असे भक्ताचा कैवारी ॥

---

१; गीता ७।२४. २; शिरडी हा शीलधीचा अपभ्रंश आहे, साईनाथ सगुणोपासना पहा.

धावुनी भेटे। भेटे तो त्वरित॥ स०॥ ३॥ जसा हा स्वामी। स्वामी शिळधींत। तसा तो सकळ विश्वभरित॥ स्वात्मशक्तीनें। शक्तीनें फिरत। स्वरुप दावुनी करित पुनित॥ कृष्णदासाला। दासा मधुपुरित॥ स०॥ ४॥

एका साईबाळाने रचिलेली व या गु० पौं० चे
समारंभांत म्हटलेली आरती

भ्रमला हा जीव आतां कोणां ओवाळूं। विश्वीं भरुनी उरला माझा नाथ कृपाळू ॥१॥ ओंवळूं मी गेलों सद्गुरु नाथ राउळीं। राउळ निमालें मीच माझी माउली ॥२॥ भ्रमला०॥ आरती हातीं घेउनि ठेलों उभा सामोरी। अंतर्दृष्टी पाहें नाथ मज माझारी॥ ३॥ भ्रमला०॥ सोहं ज्योती उजळोनी आरती केली। बें.च प्रभेमाजी प्रगटे साई माउली॥ ४॥ भ्रमला०॥ गुरुचरणीं विश्वास धरोनी बाळ चालला॥ साई चरणीं समरस होऊनि मुक्तचि झाला॥ ५॥

रा. रा. रघुनाथ काशिनाथ डुबे यांनीं रचिलेलीं व यंदाच्या गुरुपौर्णिमेचे उत्सवांत श्रीसाईबाबांचे समाधीसमोर त्यांनी म्हटलेली पदें:

## पद १

आधीं वंदूं गणपती। इष्ट देवतानुग्रहप्राप्ती॥ धृ०॥ जय जयाजी मुषक वाहना। गीरिजानंदना मंगलवदना। प्रसाद पूर्ण करी मद्वचनां। हा साईच गजानन गणपती॥ आधीं वंदूं०॥१॥ ब्रह्मविणा जीचें करी। सरस्वती जे चातुर्य लहरी। अशी नमू या ब्रह्म कुमारी। हा साईच सरस्वती भगवती॥ आधीं वंदूं॥ २॥ रज, तम, सत्व गुणाकार। ब्रह्मा, विष्णु, आणि शंकर। मग वंदूं शुकशौनकादी सूत्रकार। प्रणिपात केला गोत्रजां पुढती॥३॥ आधीं वंदूं॥ जन्म देती माता। स्वयें काढोनी

मजकरितां। पाळिलें पोशिलें मजप्रती॥ आधीं वंदूं॥ ४॥ ॐनमोजी सद्गुरुराया। साई समर्था करुणालया। चराचराच्या विसाविया। मति ग्रावी मज या पुढती॥ आधीं वंदूं॥ ५॥ गुरुदास लीन तव पायीं। चरणरजाचा सेवक होई। ब्रह्मांड गोळ भरुनी राही। ऐसा नमिला सद्गुरु साई॥ आधीं वंदूं॥ ६॥

## पद २

सावध तुम्हि राहा हो, बंधुजनहो॥ धृ०॥

नैवेद्य झाला, विडा दिधला, हुक्का अर्पण केला। कोमल तरुचें बीज रोविलें भाव जल घाली त्याला, बंधुजनहो॥ सावध०॥ १॥ धूपआरती, तूपआरती, कापुरार्ती केली, बाबांना। भावजळें अंकुर आले। ज्ञान पल्लव ते फुटले, बंधुजनहो॥ सावध०॥ २॥ पुष्पांजळी ती वाहिली गुरुला, प्रदक्षिणा जाहाली। ज्ञान वृक्ष वाढुं लागलें। विवेका फल तें आलें, बंधुजनहो॥ सावध०॥ ३॥ अष्टक होऊनी, भजनासी हो मन आतुर जाहालें। विवेक फल तें पक्व जाहालें, गुरुचरणीं विरघळले, बंधुजनहो॥ सावध०॥४॥ हात जोडुनी गुरु दास विनवी, भजनामृतसेवा। आळस निद्रा दुरी सारुनी। साई चरणीं मन लावा, बंधुजनहो॥ सावध०॥ ५॥

## पद ३

नजरभर देखो। नजरभर देखो। कछुखरच नहिरे। मुफतनाम चाखो॥ धृ०॥ है कुई ऐसा ये दुनियामो। जाकर बोले बात॥ देखो बाबा गोदाकिनारे। उनसे जोरो हात॥ नजरभर०॥ १॥ वोही मुरशद। वोही मौला,। वोही बना है पीर॥ आब कांहा पकरू निमाज। राजा वोही भरा भरपूर॥ नजरभर०॥ २॥